<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.४</u>

<u>नि.फौ.ख.क्र.१५९/२०२१</u>
सरकार विरूध्द विशाल
निशाणी – १२

मी शपथपूर्वक खरे सांगतो की

माझे नाव – गजानन हेमरावजी अंबाळकर
वय – अंदाजे ४० वर्ष, व्यवसाय – खाजगी
राहणार – कांद्री , कन्हान.

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती भिवगडे यांच्या कडून**

घटना २०२१ ची आहे. माझ्या घरासमोर दिपक जर्नाधन ढोबळे हा माझ्या घरासमोर राहायला आला होता. त्याने मला आवाज दिला व सांगितले की त्याच्या घरी चोरी झाली होती. त्यानंतर मी त्यांच्या घरी गेलो. तेथे चार पाच पोलिस वाले आले होते. तेथे पंचनामा चालू होता. काय चोरीला गेले मला माहिती नाही. या व्यतिरीक्त मला काहीही आठवत नाही.

**(साक्षीदार हा त्याच्या पूर्वीच्या जबाबाप्रमाणे कथन करीत नसल्यामुळे त्यास सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

हे म्हणणे खरे नाही की माझ्या जबाबामधील लाल शाईने अधोरेखांकित केलेला भाग–अ मधील मजकूराप्रमाणे घडले होते. हे म्हणणे खरे नाही की मी दि.२७.०५.२०२१ रोजी दिपक पडोळे याच्यासोबत कन्हान पोलिस ठाण्यात गेले होते. हे म्हणणे खरे नाही की दिपक पडोळे च्या घरातून चोरीला गेलेले नळ पोलिसांनी तेथे दाखविले व तेथे ज्याने चोरी केली तो व्यक्ती हजर होता. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पंकज यादव यांनी नाकारला.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.01.03 15:34:47 +0530

कामठी
दिनांक ०१/०१/२०२६

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी